सुरक्षा रक्षक मंडळात सुरक्षा रक्षकांची नोंदणी करण्याबाबतची कार्यप्रणाली आणि निकष निश्चित करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

2018

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
शासन निर्णय क्रमांक : एसजीए-१५२००१/(७४/७)/कामगार-५
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ९ मे, २००२

प्रस्तावना -

सुरक्षा रक्षक मंडळात नोंदीत असलेल्या मुख्य मालकास त्यांच्या आवश्यकतेनुसार सुरक्षा रक्षक मंडळाकडून सुरक्षा रक्षकांची मागणी केल्यास त्या मागणीनुसार आणि आवश्यकतेनुसार मंडळाने मंडळाच्या नोंदीत मालकास सुरक्षा रक्षक पुरविणे आवश्यक असते व त्याकरिता मंडळाच्या समुचित यादीवर आवश्यक तेवढे सुरक्षा रक्षक उपलब्ध असणे आवश्यक आहे.

सुरक्षा रक्षक मंडळ, बृहन्मुंबई व ठाणे जिल्हयाकरितां, येथे सुरक्षा रक्षकांची नोंदणी करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. या संदर्भात सुरक्षा रक्षक मंडळाकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावासंबंधी विचारविनिमय करुन शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय -

भविष्यात सुरक्षा रक्षक मंडळाच्या समुचित यादीवर आवश्यक तेवढया सुरक्षा रक्षकांची उपलब्धता व्हावी यास अनुसरुन सुरक्षा रक्षकांची मंडळात नोंदणी करण्यासंदर्भात समक्रमांकाचे दि.८.१.२००२ रोजीचे शासन निर्णय रद्द करण्यात येऊन आता खालीलप्रमाणे प्रस्तावित करण्यांत येत आहे.

१) उमेदवारांची नोंदणी - अध्यक्ष, सुरक्षा रक्षक मंडळाने सर्व बाबींचा विचार करुन आवश्यक उमेदवारांची संख्या निश्चित करावी व त्यापैकी पाच टक्के जागा विशेष गुण प्राप्त उमेदवारांकरिता राखीव ठेवावी.

२) आरक्षण - सुरक्षा रक्षकांची नोंदणी करतेवेळी खालीलप्रमाणे आरक्षण लागू राहील

| | | |
|---|---|---|
| अनुसूचित जाती | - | १३ % |
| अनुसूचित जमाती | - | ७ % |
| विमुक्त जाती | - | ३ % |
| भटक्या जमाती | - | २.५ % |
| धनगर व तत्सम | - | ३.५ % |
| वंजारी | - | २ % |
| इतर मागासवर्गीय | - | १९ % |
| विशेष मागास प्रवर्ग | - | २ % |

..२.

२% जागांवर ज्या अल्पसंख्याक उमेदवाराने ५० % पेक्षा जास्त गुण प्राप्त केले आहे अशा उमेदवारांना गुणवत्ता यादीशिवाय प्राधान्य देण्यात यावे.

३) <u>उमेदवारांच्या नांवाची यादी मागविणे</u> - पात्र उमेदवारांनी मंडळाने विहित केलेल्या नमुन्यात सेवा योजन कार्यालयाच्या वैध नोंदणी कार्डाच्या छायांकित प्रतीसह मंडळाकडे अर्ज करावा. सदर अर्जाची किंमत रु.१०/- इतकी असेल.

नोंदणीसंबंधीची माहिती अधिकाधिक इच्छुक उमेदवारांना व्हावी व त्यांना त्याचा लाभ मिळावा यासाठी नोंदणीसंदर्भात जाहिरात अत्याधिक खप (maximum circulation) असलेल्या दोन राज्यस्तरीय मराठी वृत्तपत्रातून देण्यांत येईल.

४) <u>उमेदवारांच्या शारिरीक व शैक्षणिक पात्रतेचे निकष</u> - वरील कार्यालयातून पात्र उमेदवारांच्या नावांची यादी मागविताना उमेदवारांच्या शारिरीक व शैक्षणिक पात्रता असणे आवश्यक आहेत.

उमेदवारांच्या शारिरीक व शैक्षणिक पात्रतेचे (किमान) निकष खालीलप्रमाणे आहेत.

| | पुरुष उमेदवार | महिला उमेदवार |
|---|---|---|
| उंची | १६५ से.मी. | १५५ से.मी. |
| वजन | ५० कि. ग्राम | ४८ कि.ग्राम |
| छाती | किमान ७९ से.मी.: फुगवून ८४ से.मी. | |
| शिक्षण | ~~किमान आठवी परीक्षा उत्तीर्ण~~ १२ वी | ~~किमान आठवी परीक्षा उत्तीर्ण~~ १2 वी |
| वय | १) खुल्या गटातील उमेदवारांसाठी : १८:३० वर्षे<br>२) मागासवर्गीय गटातील उमेदवारांसाठी : १८ - ३५ वर्षे<br>३) परिणामीत सुरक्षा रक्षकांसाठी सदर अट लागू नाही<br>४) माजी सैनिकांच्याबाबतीत वयाची अट राहणार नाही. (म्हणजेच त्यांची नोंदणी वय वर्षे ४५ पर्यंत होऊ शकेल.) | १) खुल्या गटातील उमेदवारांसाठी : १८-३० वर्षे<br>२) मागासवर्गीय गटातील उमेदवारांसाठी : १८-३५ वर्षे<br>३) परिणामित सुरक्षा रक्षकांसाठी सदर अट लागू नाही.<br>४) माजी सैनिकांच्याबाबतीत वयाची अट राहणार नाही. (म्हणजेच त्यांची नोंदणी वय वर्षे ४५ पर्यंत होऊ शकेल.) |

५) <u>निवड समिती गठीत करण्याबाबत</u> :- सुरक्षा रक्षक मंडळात नोंदीत करण्यासाठी पाच उमेदवारांची निवड करण्यासाठी खालील सदस्यांची समिती गठीत करण्यात येईल.

अ) प्रधान सचिव (कामगार) यांचे प्रतिनिधी
ब) पोलीस आयुक्त, मुंबई यांचे प्रतिनिधी
क) कामगार आयुक्त, मुंबई यांचे प्रतिनिधी
ड) अध्यक्ष, सुरक्षा रक्षक मंडळ, मुंबई
ई) संचालक, सेवायोजन कार्यालय यांचे प्रतिनिधी

तोंडी परीक्षेकरीतां उपरोक्त समितीचे अध्यक्ष हे उपरोक्त सदस्यांपैकी सर्वात ज्येष्ठ असलेले अधिकारी हे राहतील.

६) <u>लेखी परीक्षा</u> - लेखी परीक्षा ६० गुणांची असेल. लेखी परीक्षेची प्रश्नावली शासनाच्या पातळीवर महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्थेकडून (MILS.MUMBAI) मराठीतून तयार करुन देण्यात येईल. याबाबत सुरक्षा रक्षक मंडळ योग्य ते शुल्क महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्थेस प्रत्येक वेळी प्रश्नपत्रिका तयार करणे, उत्तर पत्रिकांची तपासणी इ. कामाकरीतां उपलब्ध करुन देईल.

या प्रश्नपत्रिकेत वस्तूनिष्ठ बहुपर्यायी (OBJECTIVE TYPE MULTIPLE CHOICE) स्वरुपाचे ९० प्रश्न असतील प्रश्नपत्रिकेत १५ गुण निबंधाकरीतां राहतील. लेखी परीक्षेत ३० गुण मिळविणे अनिवार्य राहील.

७) <u>मैदानी परीक्षा</u> :- शैक्षणिक व शारिरीक निकषांची पूर्तता केलेल्या उमेदवारांची मैदानी परीक्षा घेण्यात येईल. पुरुष उमेदवारांची किमान ४०० मीटर व महिला उमेदवारांची किमान १०० मीटर धावणे, हाताच्या सहाय्याने शरीर वर घेणे (PULL-UPS), झोपून गुढगे न वाकविता कंबरेपासून वरचेवर शरीर वर उचलणे (SIT-UP) इ. च्या परीक्षाकरीतां २५ गुण राहतील.

मैदानी परीक्षेत १५ गुण मिळविणे अनिवार्य राहील. सदर परीक्षेच्या प्रत्येक गटाकरीतां वेगळी परीक्षक राहील.

८) <u>तोंडी परीक्षा</u> :- लेखी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची तोंडी परीक्षा शासनाने गठीत केलेल्या निवड समितीद्वारे घेण्यात येईल. तोंडी परीक्षा ही उमेदवाराचे व्यक्तीमत्व जाणून घेण्यासाठी तसेच उमेदवारास सामाजिक सुरक्षिततेबाबतचे ज्ञान आहे किंवा कसे हे जाणून घेण्याच्या दृष्टीने घेण्यात येईल. सदर तोंडी परीक्षेसाठी १५ गुण असतील.

९) <u>वैद्यकीय तपासणी</u> :- लेखी, मैदानी व तोंडी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या व नोंदणीस पात्र झालेल्या उमेदवारांची वैद्यकीय तपासणी सुरक्षा रक्षक मंडळामार्फत करण्यात येईल. रातआंधळेपणा (COLOUR BLINDNESS) असणारा उमेदवार नोंदणीस पात्र ठरणार नाही.

१०)  <u>नोंदीत सुरक्षा रक्षकांसाठी प्रशिक्षण</u> :- मंडळात नोंदीत झालेल्या सुरक्षा रक्षक्रांना मंडळाच्या कोणत्याही नोंदीत मुख्य मालकाकडे सुपूर्द करण्यापूर्वी त्यांना किमान पाथमिक स्वरुपात प्रशिक्षण देणे गरजेचे असल्याने त्यांना मंडळाच्या प्रशिक्षण केंद्रामार्फत किमान ३० दिवसांचे प्रशिक्षण देण्यात यावे.

प्रशिक्षणाच्या कालावधीत प्रशिक्षण विविध विषयांच्या विषयवार वस्तुनिष्ठ स्वरुपाच्या प्रश्नांवर आधारित परीक्षा घेण्यात येईल व त्यात उमेदवाराने किमान ५० टक्के गुण मिळविणे आवश्यक आहे.

११)  <u>प्रतिक्षा यादी</u> :- काही कारणास्तव निवड झालेला उमेदवार हजर न होणे, आपत्कालीक अचानक जास्त उमेदवारांची गरज भासणे इत्यादी प्रसंगाकरीतां उमेदवारांची प्रतिक्षा यादी आवश्यक राहील अशा उमेदवारांची संख्या एकूण गरजेच्या ५ टक्के असावी व सदर यादी ३ महिन्यांकरीतां अस्तित्वात राहील. मात्र त्या आधी जर परत सुरक्षा रक्षकांची नियमित नोंदणी जाहीर झाल्यास प्रतिक्षा यादी आपोआप व्यपगत समजण्यांत येईल.

१२)  <u>विशेष गुणवत्ता प्राप्त उमेदवार</u> :- विशेष गुणवत्ता प्राप्त उमेदवारांकरीतां एकूण आवश्यक नोंदणीकृत उमेदवाराच्या ५ टक्के जागा राखीव ठेवण्यात यावी. ज्या पास गुणवत्ता प्राप्त उमेदवारांना मैदानी, लेखी व तोंडी परीक्षेत ५० टक्के गुण प्राप्त झाले. मात्र त्यांचे नांव निवड यादीत आले नाही अशा विशेष गुणवत्ता प्राप्त उमेदवारांची शासनाच्या शिफारशीने नोंदणी करण्यात येईल.

निवड समितीने शिफारस केलेल्या पात्र उमेदवारांच्या यादीनुसार संबंधित उमेदवारांना मंडळात नोंदीत करण्यासाठी मंडळ आवश्यक ती कार्यवाही करेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

(खालिद बी. अरब)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :

१)  कामगार आयुक्त, मुंबई
२)  संचालक, महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था, दादाभाई चमारबागवाला मार्ग, परळ, मुंबई-१२.
३)  अध्यक्ष, सुरक्षा रक्षक मंडळ, कॉपर रोलर्स लि. कंपाऊंड, दुसरा मजला, एल.बी.एस. मार्ग, भांडूप, मुंबई-७८.
४)  निवड नस्ती (कामगार-५)

AKWGR